# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:24.06.2024** **वार:सोमवार**

---

1. नीट प्रश्नपत्रिका फुटीप्रकरणी सीबीआयकडून तक्रार दाखल, लातूरमध्ये दोन शिक्षकांना अटक
2. अठराव्या लोकसभेच्या पहिल्या अधिवेशनाला आजपासून सुरूवात
3. क्रीडा क्षेत्रात मुला-मुलींना समान संधी देण्यासाठी राज्य शासन पुढाकार घेणार-क्रीडामंत्री संजय बनसोडे यांची ग्वाही.
4. पुण्यातील एका पबमध्ये अमली पदार्थ विक्रीसंदर्भात पाचजणांवर गुन्हा दाखल आणि
5. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मर्यादित षटकांच्या मालिकेत भारतीय महिला क्रिकेट संघाला निर्भेळ यश

**<u>नीट</u>**

वैद्यकीय प्रवेश परीक्षा अर्थात नीट युजीच्या प्रश्नपत्रिका फुटीप्रकरणी केंद्रीय शिक्षण मंत्रालयानं केलेल्या तक्रारी नंतर केंद्रीय अन्वेषण विभागानं म्हणजेच सीबीआयनं एफआयआर नोंदवून या प्रकरणाचा तपास सुरू केला आहे. या प्रकरणाच्या तपासासाठी सीबीआयनं विशेष पथकं तयार केली आहेत. ही विशेष पथकं पाटणा आणि गोध्रा इथं पाठवली आहेत. राष्ट्रीय परीक्षा संस्थेनं पाच मे रोजी देशभर आयोजित केलेल्या नीट परीक्षेदरम्यान काही राज्यांमध्ये प्रश्नपत्रिका फुटल्याच्या घटना घडल्या होत्या. या प्रकरणाचा सखोल तपास करण्याची विनंती शिक्षण मंत्रालयानं सीबीआयला केली आहे. परीक्षेचं पावित्र्य अबाधित राखण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या हिताचं रक्षण करण्यासाठी सरकार वचनबद्ध आहे. तसंच या प्रकरणात दोषी असणाऱ्यांविरोधात कडक कारवाई केली जाईल, असं शिक्षण मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<u>नीट-नांदेड</u>**

नीट प्रश्नपत्रिका फुटी प्रकरणाचे धागेदोरे लातूरपर्यंत पोहोचल्याचं उघड झालं आहे. नांदेडच्या विशेष तपास पथकानं संजय जाधव आणि जलील उमरखाँ पठाण या जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांना अटक केली. तसेच इरन्ना कोनगलवार आणि दिल्लीतील गंगाधर नावाचा एकजण अशा चौघांवर लातूरच्या शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लातूर शहर उपविभागीय पोलीस अधिकारी भागवत फुंदे यांच्या नेतृत्वाखाली स्थापित विशेष पथकाद्वारे पुढील तपास केला जात आहे.

**<u>फेरपरीक्षा</u>**

दरम्यान वैद्यकीय आणि दंतवैद्यकीय पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीच्या नीट-यूजी परीक्षेत अतिरिक्त गुण मिळालेल्या एक हजार 563 विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा काल घेण्यात आली. यापैकी 813 जणांनी काल परीक्षा दिली. विविध प्रवेश परीक्षांवरच्या आक्षेपांच्या पार्श्वभूमीवर काल 23 जूनला होणारी नीट-पीजी रद्द करण्याचा निर्णय घेतल्याचं केंद्रीय आरोग्य मंत्रालयानं घेतला. परीक्षेचं सुधारित वेळापत्रक लवकरच जाहीर होईल असं मंत्रालयानं म्हटलं आहे.

**<u>ससंद अधिवेशन</u>**

अठराव्या लोकसभेचे पहिलं अधिवेशन आजपासून सुरू होणार आहे. या अधिवेशनासाठी भाजपचे ज्येष्ठ खासदार भर्तृहरी महताब यांची लोकसभेचे हंगामी  सभापती म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. ते नवनिर्वाचित लोकसभा खासदारांना शपथ देतील. नवीन लोकसभा अध्यक्षांची निवड 26 जूनला होणार आहे, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू 27 जूनला, लोकसभा आणि राज्यसभेच्या संयुक्त सभेला संबोधित करणार आहेत. राज्यसभेचं सत्र 27 जूनला सुरू होणार आहे. संसदेचं हे अधिवेशन तीन जुलैपर्यंत चालणार आहे.

**ऑलिम्पिक दिन**

क्रीडा क्षेत्रात मुला-मुलींना समान संधी देण्यासाठी राज्य शासन पुढाकार घेईल, अशी ग्वाही राज्याचे क्रीडामंत्री संजय बनसोडे यांनी दिली. महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेच्या वतीनं आयोजित केलेल्या ऑलिम्पिक दिनाच्या कार्यक्रमात ते काल पुण्यात बोलत होते. राज्यात क्रीडासंस्कृती रुजविण्यासाठी भरीव तरतूद करण्यात येत असून तालुका क्रीडा संकुलासाठी पाच कोटी, जिल्हा क्रीडा संकुलासाठी पन्नास कोटी तर विभागीय क्रीडा संकुलासाठी 75 कोटी रुपयांचा निधी देण्यात येत आहे, असं सांगत शासनाच्या वतीनं जाहीर करण्यात आलेल्या विविध निर्णयांची माहिती क्रीडा मंत्र्यांनी यावेळी दिली. जागतिक ऑलिम्पिक दिनानिमित्त काल पुण्यात महाराष्ट्र क्रीडा संचालनालयाच्या वतीनं क्रीडाफेरीचं आयोजन करण्यात आलं. तसंच योग, जिम्नॅस्टिक, मुष्टियुद्ध, तायक्वांदो, मर्दानी खेळ आदी खेळांची प्रात्यक्षिकं सादर करण्यात आली.

**मधुमित्र पुरस्कारार्थी-अहमदनगर**

महाराष्ट्र राज्य खादी आणि ग्रामोद्योग मंडळाच्यावतीनं देण्यात येणाऱ्या यंदाच्या 'मधुमित्र' पुरस्कारासाठी अहमदनगर जिल्ह्यातल्या अकोले तालुक्यातल्या अंबड गावातील शेतकरी राजू कानवडे यांची निवड झाली आहे. मधमाशापालन हा व्यवसाय निसर्ग संवर्धनासाठी आणि शेती उत्पादन वाढीसाठी उपयुक्त असून मधमाशांची भुमिका महत्वाची असल्यानं या क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन मिळावं हा या पुरस्कारामागील प्रमुख उद्देश आहे. उद्या 25 जूनला पुण्यात या पुरस्कारांचा वितरण सोहोळा होणार आहे. हा पुरस्कार जाहीर झाल्यानंतर आकाशवाणीशी बोलताना राजू कानवडे म्हणाले....

**पुणे ड्रग्ज-मोहोळ**

पुण्यातील फर्ग्युसन महाविद्यालय रस्त्यावरील एका हॉटेलमध्ये एक अल्पवयीन मुलगा अमली पदार्थांचं सेवन करत असतानाचा व्हिडिओ समाज मध्यमांवर प्रसारित झाल्यानंतर पुणे पोलिसांनी काल संबंधित हॉटेलवर कारवाई केली. या प्रकरणी पोलिसांच्या गुन्हे शाखेने 5 जणांना चौकशीसाठी ताब्यात घेतलं आहे. दरम्यान ही अत्यंत गंभीर बाब असून संबंधित हॉटेलच्या चालक-मालकांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश पोलिसांना दिले असल्याचं केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. ज्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत हा प्रकार घडला त्या पोलीस ठाण्याच्या निरिक्षकांना आणि जबाबदार घटकांना तातडीने निलंबित करण्याच्या सूचना दिल्या असल्याचंही मोहोळ यांनी या संदेशात म्हटलं आहे.

**सौरऊर्जा निर्मिती प्रकल्प**

सौरउर्जा मुबलक प्रमाणात उपलब्ध असल्यानं साखर कारखान्यांनी सौरउर्जा निर्मिती प्रकल्प राबविण्याबाबत विचार करण्यासंबंधीच्या सूचना साखर आयुक्त डॉक्टर कुणाल खेमनार यांनी दिल्या आहेत. ग्रामीण भागातील साखर कारखाने हे हरित उर्जा तयार करणारे मोठे स्त्रोत आहेत. हरित हायड्रोजन निर्मितीसाठी कारखान्यांना मोठी संधी प्राप्त होणार आहे. हरित उर्जा, सौर उर्जेद्वारे तयार केल्यास ती वर्षभर मिळू शकते, असंही कुणाल खेमनार यांनी सांगितलं.

**विधवा-नाशिक**

विधवा महिलांना सन्मान दिला पाहिजे, तसंच महिलांनी स्वावलंबी होऊन कुटुंबाला देखील आधार दिला पाहिजे, असं मत काल नाशिक इथं आयोजित विधवा मेळाव्यात व्यक्त करण्यात आलं. जागतिक विधवा महिला दिनाच्या निमित्तानं काल नाशिकच्या रुंग्टा महाविद्यालयात हा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात विधवा महिलांच्या विविध प्रश्न आणि समस्यांवर मंथन करण्यात येऊन त्यातून मार्ग काढण्याबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी अनेक विधवा महिलांनी आपल्या समस्या मांडल्या.

**लेखक सत्कार-धाराशिव**

'उसवण' या कादंबरीतून सर्वसामान्यांचं जगणं मांडलं ते लोकांना आपले वाटलं, बोली भाषित लिहिलेली ही कादंबरी असल्यामुळे ती वाचकांना आनंद देत गेली, या पुढच्या काळात कवितेच्या माध्यमातून ही साहित्यसेवा अशीच पुढे ठेवणार असल्याचं प्रतिपादन युवा साहित्य अकादमी पुरस्कार विजेते देविदास सौदागर यांनी व्यक्त केलं. ते काल धाराशीव जिल्हा पत्रकार संघ आणि मराठवाडा साहित्य परिषद शाखा धाराशिवच्या वतीनं आयोजित सत्कार प्रसंगी बोलत होते.

**<u>दुर्घटना-रायगड</u>**

रायगड जिल्ह्यातील लोणेरे श्रीवर्धन मार्गावर काल संध्याकाळी एक भरधाव कार झाडाला आदळून उलटल्यानंतर त्यातील तीन जणांचा जागीच मृत्यू झाला. मृतांमध्ये एका मुलाचा समावेश आहे, तर एक लहान मुलगा गंभीर जखमी आहे. अन्य दुर्घटनेत अलिबाग तालुक्यातील मुनवली इथं तलावात पोहायला गेलेल्या दोन मुलांचा बुडून मृत्यू झाला. यापैकी एका मुलाच्या मृतदेहाचा शोध घेण्यात येत आहे.

**<u>क्रिकेट</u>**

महिला क्रिकेटमध्ये भारतीय संघानं दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या मर्यादित षटकांच्या तीन सामन्यांच्या मालिकेत निर्भेळ यश मिळवलं आहे. या मालिकेतला बंगळुरूच्या चिन्नास्वामी मैदानावर झालेला शेवटचा सामना काल भारतानं सहा खेळाडू राखून जिंकला. दक्षिण आफ्रिकेनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना 8 खेळाडूंच्या बदल्यात 215 धावा केल्या. हे लक्ष्य भारतानं 41 व्या षटकात चार खेळाडूंच्या बदल्यात पूर्ण केलं. स्मृती मंधनानं 90 धावा करुन भारताच्या विजयात मोठा वाटा उचलला.

**<u>सोलापूर पाऊस</u>**

सोलापूर शहर आणि जिल्ह्यात पाऊस पुन्हा सक्रीय झाला आहे. काल संध्याकाळी सोलापूर शहरात जोरदार पावसाला सुरुवात झाली. त्यामुळे शहरातल्या रस्त्यांवर पाणी साचल्याचं दिसून येत होतं आणि हवेतही गारवा निर्माण झाला होता. दुष्काळाच्या झळा बसत असलेल्या अनेक तालुक्यातील पाणी टंचाई आणि चारा टंचाईचा प्रश्न आता काही अंशी संपला आहे. सांगोला, अक्कलकोट, करमाळा, माढा, या तालुक्यात मात्र अजूनही दमदार पावसाची प्रतीक्षा आहे.

**<u>नाशिक पाऊस</u>**

नाशिक शहरासह काही भागांमध्ये काल दिवसभर पावसानं चांगली हजेरी लावली.त्यामुळं नागरिकांना दिलासा मिळाला. पुण्यातही काल पावसाच्या काही मध्यम सरी पडल्या.

**<u>हवामान</u>**

कोकण, मध्य महाराष्ट्र, घाट प्रदेश, मराठवाडा आणि विदर्भात जोराचे वारे आणि वीजांसह, मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.